## प्रस्तावना –

ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान संचलनालय व CSC SPV e-Governance Services India Ltd. (केंद्र शासनाद्वारे प्रेरित उपक्रम) यांच्या संयुक्त माध्यमातून आपले सरकार सेवा केंद्र हा महत्वाकांशी प्रकल्प राज्यातील विविध ग्रामपंचायती मध्ये राबविण्यात येत आहे. ग्रामपंचायत पातळीवर CSC-SPV (Common Services Centres - Special Purpose Vehicle) या केंद्र शासनाद्वारे प्रेरित कंपनीच्या माध्यमातून सदर प्रकल्प राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे व यासाठी ग्रामविकास विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग व प्रस्तुत कंपनी यांचे समवेत त्रि-पक्षीय करारनामा करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनां नुसार पंचायती राज संस्थांच्या कारभारामध्ये ई-पंचायत प्रकलपांतर्गत अभिप्रेत असलेली एकसूत्रता व पारदर्शकता आणणे, नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा-दाखले त्यांच्या रहिवासी क्षेत्रात कालबध्द स्वरूपात मिळणे, तसेच इतर व्यावसायिक सेवा, जास्तीत जास्त प्रकारच्या बँकिंग सेवा (सर्व G2C व B2C सेवा) ग्रामीण जनतेला एकाच केंद्रावर मिळाव्या या हेतूने राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये “आपले सरकार सेवा कें द्र (ASSK)” स्थापन करण्यात आलेले आहेत.

आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून केंद्रशासनाचा ई-पंचायत प्रकल्प (11 NIC आज्ञावली), ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 चे 1 ते 33 रजिस्टर संगणकीकृत व ऑनलाईन करणे, ग्रामपंचायतींद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा ऑनलाईन करणे इ. कामकाज करण्यात येते.

या प्रकल्पामुळे पंचायती राज संस्थांचा कारभार संगणकीकृत होऊन ई-पंचायत प्रकलपांतर्गत अभिप्रेत असलेली एकसूत्रता व पारदर्शकता आणणे शक्य होईल. तसेच ग्रामपंचायतीद्वारा देण्यात येणारी G2C सेवा नागरिकांना आता आपले सरकार सेवा केंद्रामार्फत उपलब्ध होतील. शासनाच्या इतर विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा तसेच ग्रामीण नागरिकांना आवश्यक असलेल्या इतर व्यावसायिक सेवा (शासन सेवांव्यतिरिक्त) उदा. रेलवे, बस आरक्षण, डीटीएच रिचार्ज, बँकिंग सेवा, आर्थिक समावेशन, ई-कॉमर्स, PAN कार्ड, आधार नोंदणी, व विमा हप्ते भरणे, पासपोर्ट, इलेक्ट्रिसीटी बील, पोस्ट विभागाच्या सेवा इ. सेवा सुद्धा या केंद्रावर उपलब्ध असतील व त्या माध्यमातून सदर केंद्र भविष्यात स्वयंपूर्ण (Self-Sustainable) बनण्यासाठी प्रयत्न केले जातील.

## या प्रकल्पांतर्गत जिल्ह्यात खालीलप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्र उभारण्यात आलेले आहेत :-

ज्या ग्रामपंचायतींचे अंदाजपत्रकाची /उत्पन्न (येथे उत्पन्न म्हणजे ग्रामपंचायतींचे स्वत:चे उतपन्न + 14 व्या वित्त आयोगातून प्राप्त निधी + आदिवासी विभागाकडून प्राप्त निधी व इतर कोणताही मुक्त निधी ज्याचा पूर्णपणे खर्च करण्याचा ग्रामपंचायतींना संपूर्ण अधिकारआहे, असे समजण्यात यावे) सर्वसाधारणपणे रू. 15 लाख किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा ग्रामपंचायती कडे किमान एक स्वतंत्र आपले सरकार सेवा केंद्र उभारण्यात आलेले आहे.

या व्यतिरिक्त ज्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न रू. 15 लाखापेक्षा कमी असून सध्दा ग्रामपंचायतीला स्वत:चे स्वतंत्र आपले सरकार सेवा केंद्र उभारायचे होते व त्यासाठी अशा ग्रामपंचायती नी मागणी करणे आवश्यक होते. त्यानुसार ज्या ग्रामपंचायती नी स्वतंत्र केंद्राची मागणी केलेली आहे, त्यांना स्वतंत्र केंद्र देण्यात आलेले आहे.

तसेच ज्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न रू. 15 लाखापेक्षा कमी आहे, आणि ज्यांनी स्वतंत्र आपले सरकार सेवा केंद्र (ASSK) उभारण्याबद्दल स्वेच्छेने निर्णय घेतला नाही, त्यांना त्यांच्या भौगोलिक स्थळानुसार एकत्रित करून ग्रामपंचायतींच्या क्लस्टर ची निर्मिती करण्यात आलेली आहे.

## आपले सरकार सेवा केंद्रातून पुढील प्रमाणे सेवा प्रदान करण्यात येत आहेत :-

- ग्रामपंचायतींच्या प्रशासनाचे संगणकीकारण (G2G) करणे:
- ग्रामपंचायतींच्या लेखा संहिता 2011 मधील दनंदिन कामकाजाचे 1 ते 33 नमूने संगणकीकृत करणे.

- ई पंचायत कार्यक्रमाअंतर्गत NIC आज्ञावली वापरणे.

1. Local Government Directory
2. एरिया प्रोफाइलर
3. प्लन प्लस
4. प्रियासॉफ्ट
5. अक्शन सॉफ्ट
6. असेट डिरेक्टरी
7. सर्विस प्लस
8. ट्रेनिंग मनेजमेंट
9. सोशल ऑडीट व मिटिंग मनेजमेंट
10. नशनल पंचायत पोर्टल
11. बेसिक GIS प्रणाली

**ग्रामपंचायती द्वारे देण्यात येणारे दाखले:-**

1 जन्मनोंदणी व प्रमाणपत्र
2 मृत्यू ची नोंदणी व प्रमाणपत्र
3 रहिवासाचा दाखला व प्रमाणपत्र
4 विवाहाचा दाखला
5 नोकरी व्यवसायासाठी नाहरकत प्रमाणपत्र
6 मालमत्ता आकारणी प्रमाणपत्र
7 मालमत्ता फेरफार प्रमाणपत्र/ प्रत
8 नादेय प्रमाणपत्र
9 बेरोजगार प्रमाणपत्र
10 वीजेच्या जोडणीसाठी नाहरकत प्रमाणपत्र
11 कोणत्याही योजनेचा फायदा घेतला नसलयाचे प्रमाणपत्र
12 शौचालय दाखला
13 जॉब कार्ड
14 बांधकामासाठी अनुमती प्रमाणपत्र
15 नळजोडणीसाठी प्रमाणपत्र
16 चारीत्र्याचा दाखला
17 निराधार योजनेसाठी वयाचा दाखला
18 दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र
19 हयातीचा दाखला

## महाऑनलाईन मार्फत पुरविण्यात येणाऱ्या ४००+ सेवा :-

- जेष्ठ नागरिक प्रमाणपत्र
- वंशावळीचे प्रमाणपत्र
- मिळकतीचे प्रमाणपत्र
- वय, राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र
- वारसा प्रमाणपत्र
- रहिवाशी प्रमाणपत्र
- ७/१२
- ८ अ उतारा
- नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र
- जातीचे प्रमाणपत्र
- विवाह प्रमाणपत्र
- डोंगरी असल्याचा दाखला

इत्यादी ४००+ प्रकारच्या सेवा आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून देण्यात येत आहेत.